पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०३

**सभावृत्तांत**

दिनांक - ०५/०९/२०१९ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **०५/०९/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.गायकवाड निर्मला मनोज
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.वैशाली जालिंदर काळभोर
५. मा.सुलक्षणा राजू धर
६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
७. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

अ) दिनांक १८/०४/२०१९, ०७/०५/२०१९, १६/०५/२०१९, ०६/०६/२०१९, २०/०६/२०१९, ०४/०७/२०१९, १६/०८/२०१९ (दु.१.४५वा.), २९/०८/२०१९ (दु.२.००वा.) व ३०/०८/२०१९ (स.११.३० वा.) रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १६/०८/२०१९ (दु.२.०० वा.), २९/०८/२०१९ (दु.२.१५ वा.) व ३०/०८/२०१९ (स.११.३० वा.) रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) मनपा प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना द्वितीय सत्रात शालेय वहया देणेबाबत – मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) शिक्षण समिती सभा क्र.२ ठराव क्र.३ मध्ये दुरुस्ती करणे बाबत. – मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी व शैक्षणिक वाढीसाठी प्रायोगिक तत्वावर खाजगी संस्था नेमण्याबाबत. - मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पवित्र प्रणाली अंतर्गत निवड झालेल्या पात्र शिक्षकांना नियुक्ती देणेबाबत. – मा.निर्मला गायकवाड , मा. रेखा दर्शले यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणेबाबत. – मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०४ विषय क्रमांक – ०१

दिनांक - ०५/०९/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत शिक्षण समिती सदस्य शालेय साहित्यांची तपासणी करण्याकरिता गेलो असता, असे निदर्शनास आले की, शालेय अभ्यासक्रम वाढला असल्याने विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय वहया हया विद्यार्थ्यान्ज्ञ अपु-या पडत आहेत. मनपा शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने ते वहया बाहेरुन खरेदी करु शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. हया संदर्भात संबंधित शाळेतील मुख्याध्यापक व विभागीय पर्यवेक्षक यांनी विद्यार्थ्यांना वहया अपु-या असल्याने जादा वहयांची मागणी केली आहे. प्रथम सत्रात वाटप केलेल्या वहया हया उत्तम दर्जाच्या असल्याने विद्यार्थ्यांना द्वितीय सत्रात शालेय वहया संबंधित पुरवठाधारकाकडून विधानसभा आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मागील दराने खरेदी आदेश करुन सर्व प्राथमिक शाळेत तेवढयाच संख्येने वाटप करणेकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०५ विषय क्रमांक – ०२

दिनांक - ०५/०९/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती कार्यपत्रिका क्र.२ ठराव क्र.३ दिनांक- ३०/०८/२०१९ पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या शाळांमध्ये शिकणारे असंख्य विद्यार्थी हे गोर-गरीब, कष्टकरी कामगार वर्गातील असून त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. या वर्षी पिंपरी चिंचवड मनपा शहर परिसरात मोठी पर्जन्यवृष्टी झाल्याने शहरात पुरजन्य परिस्थिती निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या घरामध्ये, वस्तीमध्ये, झोपडपट्टीमध्ये मोठया प्रमाणात पाणी शिरल्याने विद्यार्थ्यांना वाटप केलेले शालेय गणवेश, पी.टी.गणवेश व शालेय स्वेटर या साहित्याचे नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी सदरचे साहित्य पाण्याबरोबर वाहूनही गेले आहे. तरी शालेय गणवेश, पी.टी.गणवेश व शालेय स्वेटर या साहित्यापासून एकही विद्यार्थी वंचित राहू नये, त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, म्हणून शालेय गणवेश, पी.टी.गणवेश व शालेय स्वेटर साहित्य पुरवठा करणा-या पुरवठाधारकामार्फत सदर साहित्याचे शहरातील सर्व पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळेतील पुर बाधीत विद्यार्थ्यांना त्वरित वाटप करण्यास मान्यता देणेत येत आहे. असे नमूद असून सदरच्या खर्चास

मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०६ विषय क्रमांक – ०३

दिनांक - ०५/०९/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असणा-या अंदाजे ५०,००० विद्यार्थ्याची शैक्षणिक वाढ व दैनंदिन सुरक्षितेचा विचार करता महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना केलेबाबत दिसून येत नाही. तसेच आजकाल समाजामध्ये लहान मुलांबाबत अघटीत प्रकार घडत असल्याचे जास्त प्रमाणात दिसून येत आहे. तसेच महानगरपालिकेत शिक्षण घेत असणा-या विद्यार्थ्यांच्या पालक हे कष्टकरी,कामगार वर्गातील असल्याने पालकांचे विद्यार्थ्याकडे सुरक्षिततेच्या दृष्टीने व शैक्षणिक दृष्टीने लक्ष कमी असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच विद्यार्थ्यांना कळाले आहे किंवा नाही? विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती आहे किंवा नाही ? महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्याना मिळणा-या शिक्षण , साहित्य व अन्य सोयीसुविधेचा लाभ त्यांच्या पर्यंत पोहचला किंवा नाही ? याबाबत शिक्षण विभागाकडे नोंदी असणे आवश्यक असल्याने याबाबत कोणत्याही प्रकारची उपाययोजना शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेली नाही. ही बाब अतिशय गंभीर असून याबाबत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शैक्षणिक वाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठी उपाययोजना करणे अनिवार्य असल्याने व प्राप्त होणा-या सुचनेनुसार शिकविण्याच्या पध्दतीत आवश्यक ते बदल करणे शक्य होईल त्यानुसार सदर विषयाबाबत Infonet BOP Services Pvt . Ltd,Pune यांच्यामार्फत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. विधानसभा आदर्श आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने थेट पध्दतीने सदर संस्थेस प्रायोगिक तत्वावर पुढील तीन महिन्यासाठी नियुक्ती करणेस मान्यता देणेस व सदरचा खर्च हा प्राथमिक शिक्षण विभागातील ई-लर्निंग स्कूल या लेखाशिर्षामधून खर्च करण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक – ०४

दिनांक - ०५/०९/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण संचालक प्राथमिक महराष्ट्र राज्य पुणे – १ यांचे दिनांक १३/०८/२०१९ व दिनांक ०४/०९/२०१९ च्या पत्रान्वये पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण विभागाकडे प्रस्तावातील यादी नुसार एकूण ९९ शिक्षकांची यादी पवित्र पोर्टल वरील मुलाखती शिवाय उपशिक्षक पदासाठी निवड करण्यात आलेल्या व नियुक्तीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेबाबत तात्काळ कार्यवाही करुन अहवाल देणेकामी कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने पात्र ठरलेल्या एकूण ९९ शिक्षकांना प्राथमिक शाळेमध्ये नियुक्ती देणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक – ०५

दिनांक - ०५/०९/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता १ ली ते १० वी मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४०७/२०१९
दिनांक : ०५/०९/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.